RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME :I ISSUE I Apr.-Jun. 2020



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor Dr. Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | संत संताजी जगनाडे महाराज यांच्या अभंगांवरील संत तुकारामांचा प्रभाव | श्री.धर्मराज करपे | 101-104 |
| 20 | संत तुकारामांचे कूटकाव्य व त्याचा चिकित्सक अभ्यास | प्रा. दिलीप महादू कोने | 105-109 |
| 21 | 'मानवता' दलित साहित्याचा विशेष | प्रा.डॉ. नवनाथ अंगद शिंदे | 110-118 |
| 22 | औरंगाबाद जिल्ह्यातील स्त्रियांचे साहित्य | प्रा.ज्योती स्वामी - धामणकर | 119-122 |
| 23 | आदिवासी लोककला आणि साहित्य | प्रा.डॉ.महादू बागल | 123-127 |
| 24 | वीरशैव नियतकालिकात 'विभूती वैभव' चे योगदान | प्रा. ज्योती स्वामी - धामणकर | 128-133 |
| 25 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी प्रेरणेस स्मरूण आत्मशोधाची गरज | प्रो. डॉ. संजय शिंदे | 134-138 |
| 26 | राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार | प्रा.घोडके कल्याण सर्जेराव | 139-143 |
| 27 | भारताचे परराष्ट्र धोरण आणि तुलनात्मक उपाययोजनाचे आवाहन भारत आणि चीन संबंध : | प्रा.डॉ.तांदळे एस.के. | 144-148 |
| 28 | समाजशास्त्र आणि साहित्य सहसंबंध | अंबिका गोविंदराव चोंडे | 149-151 |
| 29 | धुळे व नंदुरबार जिल्हयातील मावची बोलीतील लोकपरंपरा | गावित महेंद्र जोतऱ्या | 152-156 |
| 30 | ऐतिहासिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा | शिवाजी विष्णू पाटील | 157-162 |
| 31 | Covid-19 आणि सामाजिक समस्या | डॉ.सविता सा.मनोहर | 163-168 |
| 32 | मराठा इतिहासातील कन्हेरखेडचे शिंदे घराणे – एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार | 169-174 |
| 33 | कोल्हापूर जिल्हयातील जंगल जमीन–भूमीहीनांना मिळावी यासाठीची आंदोलने | डॉ.वसंत ज्ञानदेव ढेर | 175-182 |
| 34 | मनरेगाच्या अंमलबजावणीत ग्रामसभेची भूमिका | डॉ.व्ही.डी. गायकवाड प्रा.सुनिल काशिराम राठोड | 183-188 |
| 35 | कोरोना संचारबंदी आणि लोककला | डॉ. मंदा माणिकराव नांदुरकर | 189-192 |
| 36 | समाजमें महिलाओं के मानवाधिकार | डॉ. सौ. स्मिता दि. जोशी, | 193-197 |
| 37 | रामकाव्य परम्परा में रीति काव्य का योगदान | डॉ. भाऊसाहेब रा. नळे | 198-202 |


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna
Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# समाजशास्त्र आणि साहित्य सहसंबंध

अंबिका गोविंदराव चोंडे

संशोधक विद्यार्थी, सामाजिकशास्त्र संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

साहित्याचा समाजाशी घनिष्ठ संबंध असतो, समाजमनाचे आकलन करण्यासाठी साहित्याची मदत घेतली जाते. साहित्यामधून व्यक्तीला आकलन झालेल्या समाजाचे चित्र स्पष्ट होते असते. समाज आणि साहित्य यांचे सहसंबंध व्यक्तीगत राहत नाहीत तर त्यातून समाजाचे प्रतिनिधित्व करीत असते. साहित्याच्या आधारे समाजशास्त्राचा अभ्यास करता येतो, हे सांगताना रा.ग.जाधव म्हणतात, "सामान्यपणे 'व्यक्तीचे समाजातील वर्तन' हा समाजशास्त्राचा मुख्य विषय असतो, असे स्थूल मानाने म्हणता येते. या विषयाच्या व तदानुषंगिक इतर उद्दिष्टांच्या दृष्टीने 'साहित्य' हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय होऊ शकतो."[१] समाजशास्त्रात साहित्याच्या माध्यमातून समाजजीवन समजून घेता येते. समाजशास्त्राच्या अभ्यास पद्धती भिन्न आहेत, त्यात काही गृहीतके असतात, मोजमाप, काही प्रक्रिया असतात, ज्याद्वारे समाजशास्त्र साहित्याच्या साह्याने पुढे जात असते. व्यक्तीचे अस्तित्व समाजाद्वारे निर्धारीत होत जाते. या व्यक्तीद्वारे लिहिण्यात आलेल्या लेखनातून समाजाचे वास्तव प्रतिबिंबित होत जाते. साहित्य व समाज यांच्या सहसंबंधाचे नेमकेपणाने विश्लेषण करताना डॉ.सदा कऱ्हाडे म्हणता, "लोकहितवादी आणि आगरकर यांच्या वैचारिक निबंधातून मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध जेवढे सत्यस्वरूप उघड होते त्यापेक्षा अधिक सत्य हरि नारायण आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यातून उघड होते आणि म.जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सवर्णांकडून दलितांवर होणाऱ्या अन्यायाविषयी आपल्या वैचारिक ग्रंथातून जे सत्य उघड केले ते दलित आत्मकथनांतून अधिक प्रभावीपणे उघड होते स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे प्रत्यक्षगत स्वरूप स्त्रीवदी समीक्षकांनी स्त्रीकेंद्री साहित्याकडून जेवढे अभिज्ञात होते तेवढे सामाजिक संस्थांच्या समाजशास्त्रीय ग्रंथातून उपलब्ध होईल असे नाही."[२] मानवी मनाची धारणा, विचार, संवेदना ह्या जितक्या सामाजिक आहेत तितक्याच त्या व्यक्तीगत आहेत, व्यक्ती हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. साहित्यातून मानवी नातेसंबंध, जाणीवा यांची अभिव्यक्ती होते. साहित्य हे समाजसापेक्ष आहे. साहित्याला समाजाचा आरसा म्हटले जाते. (Literature is the mirror of life society) यावरून समाजाचा एक घटक म्हणून लेखक सामाजिक जाणिव मांडीत असतो. साहित्य समाजाला वगळून असत नाही. साहित्य आणि समाज याचा सहसंबंध असल्यानेच आधुनकि समाजशास्त्रज्ञ साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास करतात. २० व्या शतकात साहित्याचे समाजशास्त्र ही एक नवीन अभ्यासशाखा विकसति झाली. अलीकडे साहित्याचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते आहे. "व्हिको यांनी New Science (१७२५) या ग्रंथात आणि जर्मन विचारवंत हर्डर यांनी समाज आणि साहित्याच्या संबंधाबाबत चर्चा केली होती. मादाम दस्ताल (१७६६-१८१७) यांनी आपल्या



Co-ordinator

PRINCIPAL
Shri Guru Buddhi...

'De la leterature' या ग्रंथाच्या सुरूवातीला स्पष्टपणे नमूद केले की, माझा उद्देश हा साहित्यावर धर्म, परंपरा आणि कायद्याच्या प्रभावाचे परीक्षण करणे हा आहे. 'हीप्पोलाईट ए तेन (१८२८-१८९३) या फ्रेंच अभ्यासकाने समाजशास्त्राच्या दृष्टीकोनातून साहित्याचा अभ्यास केला त्याने 'History of literature' हा ग्रंथ लिहिला."[३] अशा स्वरूपाचा अभ्यास करणाऱ्यांमध्ये हंगेरीअन समाजशस्त्रज्ञ लुकास, जर्मन समाजशास्त्रज्ञ ल्युशीएन गोल्डमन, आहेत, साहित्याचे समाजशास्त्र ही ज्ञानशाखा यातून हळूहळू विकसीत होत जाऊन मान्यता पावली आहे.

साहित्याच्याद्वारे होणारे संशोधन हे देखील तितकेच महत्त्वपूर्ण आहे जितके इतर क्षेत्रीय संशोधन आहे. एखादी समस्या घेऊन त्यचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे हे या अध्ययनात केंद्रस्थानी आढळते.

समाजाची एक उपसंस्कृती म्हणून साहित्याकडे पाहिले जाते. समाज आणि साहित्य यांचे द्वंदात्मक नाते असते. साहित्य समाजनियमाच्या बाहेर जात नाही तसे होत असेल तर त्यावर बंदी घालण्याची मागणी समाजातून होते, मूल्य कल्पनांना सांभाळूनच साहित्यलेखन केले जाते. समाजाची स्थितीगती जशी असेल तशा स्वरूपाचे आव्हान पेलून साहित्य समाजाचे चित्रण करण्याचा प्रयत्न करीत असते. लेखक समाजाचा घटक अशा क्षेत्राविषयी विवेचन येत असल्याने त्या क्षेत्रातील विशेषतः शब्दांच्या साह्याने अभिव्यक्त होत असते. त्या त्या क्षेत्रातील परंपरा, भेदाभेद, उच्च-निचता, धार्मिकता, संस्कार, साक्षरता, ज्ञान-अज्ञान, रूढी, लग्नविधी अशा बाबींचे प्रकटीकरण लेखनाच्या मदतीने होत असते. समाजशास्त्राच्या अंगाने पाहिले तर व्यक्ती लेखक हा समाजाचा घटक आहे. त्यामुळे त्यांच्याद्वारे लिखीत मजकूर महत्वपूर्ण असल्याचे डॉ.प्रदीप आगलावे सांगतात, "साहित्य हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण व विश्वसनीय असा सामाजिक दस्तऐवज आहे. लेखकानी आपल्या साहित्याच्या रूपात हा दस्तऐवज तयार केलेला असतो. या साहित्यात लेखकाच्या विशिष्ट जाणिवा आढळतात. ह्या जाणिवांत व्यक्तीगत अनुभव, जागरूकता आणि सामाजिक जीवननिष्ठा इत्यादींचे एक सलग स्वयंपूर्ण दर्शन असते. साहित्यातून संस्कृतिचा विकास घडतो, ज्या लेखनाने समाजजीवन मांडले त्यातून अज्ञात प्रदेश समोर ठेवले त्याधारे त्यांच्या सुधारणा करण्याचे प्रयत्न केले जातात. त्यातून जीवनाला संपन्नता येते. साहित्य आणि समाज यांच्या परस्पर सहसंबंधातून मानवी जीवनाचे वास्तव समोर येत असते. सामाजिक आशय घेऊन आधुनिक साहित्य लिहीण्यात येऊ लागले. दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी, भटक्या जाती-जमाती या घटकांचे जीवन लेखनाचा विषय होऊन मोठ्या संख्येने वरील वर्गाचे जीवन लेखकाच्या लेखनाचा विषय होऊ लागला, त्यामुळे विविध समुदाय, जाती, यांच्या जीवनातील बारकावे इतरांनाही आकलन होऊ लागते.

साहित्यात समाजव्यवस्थेतील जातीव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, चालीरीती, रूढी, प्रथा, व्यवसाय, अन्य सामाजिक तत्त्वे यांचे स्वरूपविशेष प्रकट होतात. समाजशास्त्रज्ञांना समाज जीवनाचा सखोल अभ्यास करण्याची सामग्री यामुळे त्रास होत असते. साहित्यातून लोकजीवन जगण्याची पद्धती, संस्कार, आचार विचार, व्यवहार

Co-ordinator
IQAC
Estd.1983

समुदायाचे विशेष प्रकट होत जातात. समाजजीवनाचा संदर्भ सोडून साहित्याचा अभ्यास करणे म्हणजे भूसा भरलेल्या पोत्सासारखे आहे. साहित्यातून समाजाचे चित्रण प्रकट होत असते. व्यक्तीसोबत समष्टी हा विषय त्यातून प्रकट होत असतो. समाजातील सजीवावशेष साहित्यात सापडतात.

साहित्य आणि सामाजिक समस्या याविषयी जानेवारी १९८८ मध्ये पुण्यात सामाजिक परिषदेच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात साहित्यकारण आणि 'सामाजिक परिषदे'च्या या दोन दिवसाच्या प्रमुख कार्यक्रमात अपंगांचे, आदिवासींचे, अल्पसंख्यांकाचे, दलित स्त्रियांचे, सुशिक्षितांचे, श्रमिकांचे आणि इतरांचेही अनेक प्रश्न गटवार चर्चा करून हाताळण्यात आले.' पुढे अखिल भारतीय साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषणात वसंत कानेटकर यांनी 'सामाजिक परिषदे'विषयी आस्था व्यक्त केली."[५] साहित्य समाजमन ओळखाणारे असावे ही भूमिका घेतना आनंद यादव म्हणतात, "आज समाजमन जाणून साहित्यनिर्मिती करणाऱ्या साहित्यिकाची जशी गरज आहे, तशी तशा प्रकारचे साहित्य समजून घेऊन त्याचे समाजशास्त्रीय दृष्टीने सामाजिक जीवनाच्या मूल्याच्या दृष्टीने मूल्यमापन करणे आणि समाजमनस्कता दाखवून देणे याचीही नितांत गरज आहे."[६] साहित्य आणि समाज यांचा घनिष्ट संबंध असतो, त्या समाजाचा इतिहास, धर्म, कायदे, परंपरा, रूढी, देव-देवते, समाज स्वभाव, नाती, कुटुंबरचना सामाजिक स्तर साहित्यातून पुढे येतात.

**संदर्भ :**


१) रा.ग.जाधव, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, तृतीय आवृत्ती २००३, पृ.७३.

२) सदा कऱ्हाडे, समाज आणि साहित्य, लोकवाङ्मयगृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००७, पृ.१३ ते १४.

३) डॉ.प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, साईनाथ प्रकाशन नागपूर, दुसरी आवृत्ती २००८, पृ.५४९.

४) डॉ.प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्रे व तंत्रे, पृ.५५१.

५) आनंद यादव, १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, मेहता पब्ली. पुणे २००१, पृ.१०० ते १०१

६) आनंद यादव, १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, मेहता पब्ली. पुणे २००१, पृ.१५१.


■■■

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. ...